**प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प प्रवर्तक मे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-प्रवरानगर, तालुका-राहाता, जिल्हा-अहिल्यानगर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ७,२००.० टीसीडीवरुन १५,०००.० टीसीडीपर्यंत विस्तारिकरण (७,८००.० टीसीडी वाढ) आणि सहवीज निर्मिती ३०.० मेगावॅटवरुन ६८.० मेगावॅटपर्यंत विस्तारिकरण (३८.० मेगावॅटने वाढ) क्षमतेच्या प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-प्रवरानगर, तालुका-राहाता, जिल्हा-अहिल्यानगर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ७,२००.० टीसीडीवरुन १५,०००.० टीसीडीपर्यंत विस्तारिकरण (७,८००.० टीसीडी वाढ) आणि सहवीज निर्मिती ३०.० मेगावॅटवरुन ६८.० मेगावॅटपर्यंत विस्तारिकरण (३८.० मेगावॅटने वाढ) क्षमतेच्या प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळ मे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-प्रवरानगर, तालुका-राहाता, जिल्हा-अहिल्यानगर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

उप प्रादेशिक अधिकारी तथा आयोजक यांनी, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती अध्यक्ष तथा निवासी उप जिल्हाधिकारी, सदस्य

पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-प्रवरानगर, तालुका-राहाता, जिल्हा-अहिल्यानगर महाराष्ट्र यांच्या विस्तारीकरण करण्याबाबतचा जाहिर लोक सुनावणीचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदुषण नियंत्रण

सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनेचा विचार करणे आहे.

मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि.३०/०९/२०२५ रोजी आयोजित करण्याबाबत मान्यता देण्यात आली. मंडळाचे कार्यालयीन आदेश क्र. ई-६९ दि. १२/०९/२०२५ रोजी खालील प्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी –<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>नाशिक. | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहिल्यानगर. | - **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक २८-०८-२०२५ रोजी प्रस्तावित

प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्ताऐवज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर.

२) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, अहिल्यानगर.

४) उप विभागीय अधिकारी, राहाता/शिर्डी, जिल्हा – अहिल्यानगर.

५) तहसीलदार, तहसील कार्यालय, राहाता, ता. राहाता, जि. अहिल्यानगर.

६) पंचायत समिती कार्यालय, राहाता, ता. राहाता, जि. अहिल्यानगर.

७) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये - लोहगाव, बाभळेश्वर, तिसगाववाडी, लोणी बुद्रुक, कोल्हार बुद्रुक, कोल्हार भगवतीपूर, सादतपूर, चिंचपूर, हसनापूर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर.

८) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

९) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३ रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१०) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, नाशिक.

११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, पहिला मजला, हॉल नं.२ व ३, टी.व्ही. सेंटरजवळ, सावेडी, अहिल्यानगर -४१४ ००३

१२) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले व सदरील सुचनांची, आक्षेपांची इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येऊन बैठकीचे व्हिडीओ रेकॉर्डींग पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल.

आयोजकांनी मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याचे आदेशीत केले.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना किंवा टीकाटिप्पणी उपस्थित करावयाच्या असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात. आपले नांव व गावाचे नांव प्रथम सांगण्यात यावे. आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे.

Shinde

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे-**

१) **श्री सचिन बबनराव आहेर, राहणार-लोणी खुर्द, तालुका-राहाता, जिल्हा-अहिल्यानगर:-**

प्रकल्प विस्तारीकरणाचे काम किती दिवसात पूर्ण होईल?

**प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की,** आपण कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ७,२००.० टीसीडीपासून १५,०००.० टीसीडीपर्यंत, तसेच सहवीज निर्मिती ३०.० मेगावॅट ते ६८.० मेगावॅट प्रतिदिन विस्तारिकरण योजिलेले आहे. त्यासाठी ज्याकाही विविध वैधानिक परवानग्या/ना हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) लागतात, त्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच या विस्तारिकरण प्रकल्पास महाराष्ट्र शासनाची पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त झाल्यानंतर ८-१० महिन्यात विस्तारिकरणाचे काम पूर्ण होईल.

२) **श्री सुधीर आहेर, रा. प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर:-**

मी स्थानिक रहिवाशी आहे. या विस्तारिकरण प्रकल्पामुळे निर्माण होणा-या जल व वायू प्रदूषणाचे नियंत्रण कसे करण्यात येणार आहे? हा प्रश्न मी स्थानिक रहिवाशी असल्याने विचारत आहे.

**प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की,** विस्तारीकरणामुळे हवेचे प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी प्रस्तावित

विस्तारिकरण प्रकल्पात १६० टी.पी.एच बॉयलरसाठी ८५.० मीटर उंचीची चिमणी/स्टॅक लावण्यात येणार असून चिमणी/स्टॅकला इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर ही अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. ईएसपी सयंत्रणेची कार्यक्षमता ही ९९.९% एवढी असते. तसेच विस्ताकरण प्रकल्पात बॉयलरसाठी कच्चा माल म्हणून प्रकल्पातील बगॅसचा वापर करण्यात येणार आहे. बगॅसमध्ये २% राखेचे प्रमाण असते, तर .०५% सल्फरचे प्रमाण असते. साखर कारखान्यात तयार होणारा बगॅसच आपण बॉयलरला इंधन म्हणून वापरण्यात येणार आहे. त्याच प्रदूषणाचे प्रमाण कमी आहे.

तसेच पाण्याचे प्रदूषण होऊ नये म्हणून सध्या कार्यरत प्रकल्पात ८००.० घनमीटर प्रतिदिन क्षमतेचा औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (Effluent Treatment Plant -ETP) कार्यरत आहे. त्याच्या क्षमतेचे विस्तारिकरण करण्यात येऊन तो १५००.० घनमीटर प्रतिदिन क्षमतेचा करण्यात येईल. त्यात प्रक्रिया केलेल्या औद्योगिक सांडपाण्याचा प्रकल्पातील हरितपट्टा विकसनासाठी वापर करण्यात येईल.

त्याचप्रमाणे विस्तारिकरण प्रकल्पात कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्पात पाण्याची गरज ही कमी होईल. हे विचाराधीन आहे.

३) **श्री किसन चांगदेव आहेर, रा. लोणी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर:-**

प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणाचा शेतक-यांना काय फायदा होईल?

**प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी मत मांडले की**, अतिशय चांगला प्रश्न आहे. या परिसरातील शेतक-यांचा जो ऊस आहे, तो प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिक शेतक-यांना अतिरिक्त ऊससुध्दा कारखान्यास गाळपासाठी देता येईल, त्यामुळे शेतक-यांचे जे नुकसान होत होते, ते होणार नाही. प्रकल्पात आसवणी प्रकल्प आहे. त्यामुळे शेतक-यांच्या ऊसाला चांगला भाव देण्यास मदतच होईल.

४) **श्री बाळासाहेब चिंचरकर, रा. लोहगांव, ता. राहाता, जि. अहिल्यानगर:-**

विस्तारिकरण प्रकल्पात किती मनुष्यबळ आवश्यक आहे.

**प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगतले की,** विस्तारिकरण प्रकल्पासाठी सुमारे १२० लोकांना रोजगाराची संधि मिळू शकेल. मात्र प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पामुळे स्थानिक व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल उदा.-चहाची टपरी, दुचाकी दुरुस्ती केंद्रे इत्यादी. त्यामुळे सुमारे ५००-५५० व्यक्तींना अप्रत्यक्ष रोजगाराची संधि प्राप्त होणार आहे.

५) **श्री शत्रुघ्न आण्णासाहेब विखे, राहणार-लोणी बुद्रुक, तालुका-राहाता, जिल्हा-अहिल्यानगर:-**

प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्याचे नियोजन कसे करण्यात येईल?

**प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की,** सध्या कारखान्यात ७२०.० सीएमडी सांडपाणी उत्पन्न होत आहे. विस्तारिकरण प्रकल्पामुळे ५३४.० सीएमडी सांडपाणी उत्पन्न होऊन प्रकल्पात एकूण सांडपाणी १२५४.० सीएमडी एवढे तयार होईल. त्यासाठी कार्यरत प्रकल्पातील औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राची (ईटीपी) क्षमता वाढविणार असून ती १५००.० सीएमडी एवढी करण्यात येईल. त्यामुळे प्रकल्पात सर्व सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, विचार, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

६) **श्री चंद्रकांत शिंदे, आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती:-**

विस्तारिकरण प्रकल्पामुळे कारखाना परिसरात वाहनांच्या वाहतुकीत वाढ होणार आहे. त्याबाबत कारखान्याने काय नियोजन केलेले आहे?

**प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की**, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना परिसरातील वाहतुक व्यवस्थेचाही अभ्यास करण्यात आलेला आहे. कार्यरत प्रकल्पामुळे परिसरात होत

असलेली वाहतुक व विस्तारिकरणामुळे  त्यात होणारी वाढ ही अतिशय नगण्य आहे. कारण कारखाना परिसरातील रस्त्यांची व्यवस्था चांगली आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना परत प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, विचार, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आज आपण मे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांच्या साखर कारखाना विस्तारिकरण ७,२००.० टीसीडी ते १५,०००.० टीसीडी आणि सहवीज निर्मिती ३०.० मेगावॅट ते ६८.० मेगावॅट प्रतिदिन क्षमतेच्या प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीसाठी एकत्रित जमलेलो आहोत. येथे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे संभाव्य पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करुन त्याबाबत सादरीकरण उपस्थित स्थानिक जनतेसमोर सादर केलेले आहे. त्याबाबत स्थानिकांनी त्यांच्या सूचना, विचार व आक्षेप नोंदविलेले असून त्यास प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी यथोचित उत्तरे दिलेली आहेत. तरी

उपस्थित केलेल्या प्रश्नांशिवाय इतर बाबींबर सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते आपण उपस्थित करावेत. तसेच आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी केलेल्या आवाहनानूसार ज्यांना लेखी निवेदन सादर करावयाचे असतील, ते आपण सादर करु शकता, त्याची पोच देण्यात येईल. अध्यक्ष यांनी त्यासाठी अवधी दिला. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना समारोप करण्याचे आवाहन केले. आयोजक यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास ते तोंडी व लेखी उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. आयोजक यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी स्थानिक लोक यांनी बैठकीस येऊन प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयक सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल त्याचे आभार मानले व मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्यावतीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले बैठकीचा समारोप करताना मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सुचना, विचार, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश

करण्यात येईल. व सदर इतिवृत्त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या तर्फे ते पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल. मा. अध्यक्ष यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

**(चंद्रकांत शिंदे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अहिल्यानगर

**(लिंबाजी भड)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

**(दादासाहेब गिते)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा
निवासी उप जिल्हाधिकारी, अहिल्यानगर